राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ - ४३११ / २०१८ / पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमॉरत,
विधान भवना समोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| विजयकुमार शंकरराव होटकर | प्राचार्य, दि कल्याणी स्कुल, मांजरी बुद्रुक, हडपसर, पुणे ४१२ ३०७ | प्राचार्य, दि कल्याणी स्कुल, मांजरी बुद्रुक, हडपसर, पुणे ४१२ ३०७ |

द्वितीय अपील सुनावणी दिनांक- ०४ - ०९ - २०२४

अपिलार्थी यांनी दि.२५/१०/२०१८ रोजी राज्य माहिती आयुक्त,खंडपीठ पुणे यांचे कडे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. अर्जदाराने द्वितीय अपिल दाखल करताना - असे प्रयोजन नमूद केले.

आयोजित सुनावणीस विद्यमान जन माहिती अधिकारी तर्फे प्रतिनिधी श्री.विक्रम देशमुख व शाळा प्रतिनिधी श्री. अमरेश केसरे हजर आहेत. अपिलार्थी गैरहजर आहेत.

१. अपिलार्थीचा माहिती अर्ज दिनांक ३०/०८/२०१८५ रोजीचा असून तो प्राचार्य, कल्याणी स्कूल यांच्या कडे केलेला आहे.त्यानुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, दि कल्याणी स्कुल, मांजरी बुद्रुक, हडपसर, पुणे यांनी दि.२१/०९/२०१८ रोजीच्या पत्रान्वये उत्तर दिले की, त्यांना माहिती अधिकार अधिनियम लागू होत नाही.
२. अपिलार्थीचे प्रथम अपिल अर्जाबाबत कोणतेही अभिलेख आयोगास सादर केलेले नाहीत.
३. द्वितीय अपिल कारणामध्ये अपिलार्थीने, प्राचार्याचे उत्तर असमाधानकारक असे नमूद केले आहे.
४. आयोगाकडील उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अर्जदाराने माहिती अर्जात विद्यालयामध्ये Under Previllage विद्यार्थ्यांची संख्या आणि RTE खाली २५ टक्के लोकांना दिलेल्या सुविधेची माहिती मागणी केली होती. प्राचार्यांनी त्यांच्या दि.२१/०९/२०१८ च्या उत्तरात सुचित केले होते की त्यांच्या विद्यालयास माहिती अधिकार कायदा लागू होत नाही, कारण त्यांना कोणतेही अनुदान शासनाकडून दिले जात नाही.
५. सुनावणीचेवेळी व्यवस्थापन समितीचे प्रतिनिधी श्री विक्रम देशमुख यांनी स्पष्ट केले की, मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांनी W.P.NO.५१३२/२०० दि. २०/८/२००९ रोजी पारीत आदेशाप्रमाणे विना अनुदानीत शिक्षण संस्थेला माहिती अधिकार कायदा लागू होत नाही, तसेच सिव्हीत अपिल क्र.९०१७/२०१३ मध्ये मा. सर्वोच्च् न्यायालयाने दि.७/१०/२०१३ रोजी पारीत आदेशा प्रमाणे विना अनुदानीत शिक्षण संस्थेला माहिती अधिकार कायदा लागू होत नाही आणि या संदर्भात केंद्रीय माहिती आयुक्तांचा दि.१८/०१/२०१९

च्या आदेशची प्रत आयोगाकडे सादर केली त्यामध्ये देखील विनाअनुदानीत शिक्षण संस्थेला माहिती अधिकार कायदा लागू होत नाही असा निर्णय दिलेला आहे.

६. या संदर्भात माहिती अधिकार अधिनियम-२००५ चे कलम २ (एच) मध्ये शासनाचे नोटीफिकेशन (Ordered by appropriate Government) "Any public authority constituted by notification issued or order made by the appropriate government is the public authority" या संदर्भात मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद रिट-पिटीशन क्र.९३०/२०१७ व ८३१८/२०१८ मध्ये दि.१४.०२. २०२२ रोजी पारीत आदेश विचारात घेता, जरी शासनाकडुन अनुदान प्राप्त होत नसेल, तरी शासनाच्या परवानगी आधारावर काम केले जाते. त्यामुळे अशा संस्थांना Public Authority म्हणुन गृहीत धरता येईल. त्यानुसार सर्व शैक्षणिक माहविद्यालय यांना माहिती कायदा लागु होत आहे असा आदेश दिला आहे. तसेच सदर आदेशात मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर रिट पिटीशन क्र.५१३२/ २००८ मध्ये दिलेल्या आदेशाची सुध्दा दखल घेतलेली आहे. यावरुन स्पष्ट होते की, संबंधित संस्थेला माहिती कायदा लागु होत आहे. सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे. सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी प्राचार्य, दि कल्याणी स्कुल, मांजरी बुद्रुक, हडपसर, पुणे ४१२ ३०७ यांना आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने जोडपत्र "अ" मध्ये मागणी केलेली माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसांचे आत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाव्दारे/ व्यक्तीश: विनामुल्य पुरवावी.

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, दि कल्याणी स्कुल, मांजरी बुद्रुक, हडपसर, पुणे यांनी अपिल आदेशाची अंमलबजावणी विहित कालावधीत सुनिश्चित करावी.

या निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र सत्यमेव जयते पुणे खंडपीठ

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. 5360/2024 दिनांक - 7/10/2024